कर्नाटक सरकार

# मराठी सरिता

## तृतीय भाषा पाठ्यपुस्तक

## इयत्ता 6 वी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# MARATHI SARITA

## Third Language Textbook

## 6th Standard

## Part - 2

KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R)
6th Cross, Malleshwaram, Bangalore - 560 003.

# अनुक्रमणिका

C7R6S3


| अ.नं. | पाठाचे/कवितेचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 12. | अंकांची ओळख | 1 |
| 13. | नाती | 4 |
| 14. | अतिलोभ | 7 |
| 15. | भाज्यांची सभा | 10 |
| 16. | मंगळावरची शाळा | 14 |
| 17. | एकीचे बळ | 16 |
| 18. | प्रामाणिक बालक | 19 |
| 19. | ऋतुगीत | 23 |
| 20. | कोरोनाचे थैमान | 26 |
| 21 | शब्दडोंगर | 29 |
| 22. | माझा भारत | 30 |
| 23. | अंक 21 ते 50 (२१ ते ५०) | 31 |
| | शब्दसंग्रह | 34 |


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 12

W5G1P2

# अंकाची ओळख

(१ ते २० पर्यंत)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १ | एक | 11 | ११ | अकरा |
| 2 | २ | दोन | 12 | १२ | बारा |
| 3 | ३ | तीन | 13 | १३ | तेरा |
| 4 | ४ | चार | 14 | १४ | चौदा |
| 5 | ५ | पाच | 15 | १५ | पंधरा |
| 6 | ६ | सहा | 16 | १६ | सोळा |
| 7 | ७ | सात | 17 | १७ | सतरा |
| 8 | ८ | आठ | 18 | १८ | अठरा |
| 9 | ९ | नऊ | 19 | १९ | एकोणीस |
| 10 | १० | दहा | 20 | २० | वीस |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# अभ्यास

## 1) अंकात लिहा

| | | |
|---|---|---|
| दोन | 2 | २ |
| सहा | ---------------- | ---------------- |
| बारा | ---------------- | ---------------- |

## 2) शब्दात लिहा

| | | |
|---|---|---|
| 3 | ३ | तीन |
| 5 | ५ | ---------------- |
| 14 | १४ | ---------------- |

## 2) शब्दात लिहा

| | | |
|---|---|---|
| 8 | ८ | आठ |
| 16 | ---------------- | ---------------- |
| 11 | ---------------- | ---------------- |
| 19 | ---------------- | ---------------- |
| 17 | ---------------- | ---------------- |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## 4) अंक व शब्दात लिहा.

| इंग्रजी अंक | मराठी अंक | शब्दात | इंग्रजी अंक | मराठी अंक | शब्दात |
|---|---|---|---|---|---|
| 2 | | | 6 | | |
| | ११ | | | | नऊ |
| 7 | | | | १७ | |
| | | बारा | 9 | | |
| | १८ | | | | एकोणीस |
| 1 | | | | २० | |
| | | सतरा | 5 | | |
| | १५ | | | | वीस |
| 3 | | | | १६ | |
| | | चार | 6 | | |
| 14 | | | | १० | |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शिक्षकांना सुचना:** विद्यार्थ्यांनां १ ते २० पर्यंतच्या संख्या सरळ व उलट्या क्रमाने लिहिण्यासाठी सराव करुन घ्या.

पाठ 13

# नाती



उन्हामध्ये छाया
तशी माऊलीची माया ।
सूर्य जसा नभा
तसे घरामध्ये बाबा ।।



वेलीवरी जाई
तशी हसणारी ताई ।
वारा वाहे सदा
तसा खोडकर दादा ।।



पिकलेला आंबा
तसे प्रेमळ आजोबा ।
झुळझुळ पाणी
तशी आजीची गाणी ।।

गाभाऱ्यात ज्योती
तशी घरातील नाती ।।



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## अ. नाती समजून घेऊ.

१. आईच्या आईला ------------------------------

२. बाबांच्या आईला ------------------------------

३. आईच्या वडिलांना ------------------------------

४. बाबांच्या वडिलांना ------------------------------

५. आईच्या भावाला ------------------------------

६. बाबांच्या भावाला ------------------------------

७. आईच्या बहिणीला ------------------------------

८. बाबांच्या बहिणीला ------------------------------

## आ. कवितेतील लयबध्द शब्द लिहा.

नमुना :-






©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अ. खालील चौकटीत नात्यांची नावे लपलेली आहेत.
ती ओळखा व गोल करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| आ | स | ड | बा | बा | खा | गी |
| ई | ऊ | आ | का | ची | दा | दा |
| टा | डो | जी | णा | का | पे | मू |
| ती | कू | आ | त्या | ह | मा | या |
| का | मा | व | शी | कू | मा | हे |
| फ | लै | मा | मी | भा | द | ता |
| य | शा | आ | जो | बा | सू | ई |

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

पाठ 14

# अतिलोभ



एका शेतकऱ्याने बऱ्याच कोंबड्या पाळल्या होत्या. त्यातील एक कोंबडी रोज एक सोन्याचं अंडे घालायची. तो शेतकरी सोन्याची अंडी विकून चांगलाच श्रीमंत झाला होता.

ऐषआरामात दिवस घालवताना एकदा त्याच्या डोक्यात विचार आला, ही कोंबडी रोज आपल्याला एकच सोन्याचं अंडे देते. हिच्या पोटात अशी कितीतरी सोन्याची अंडी असतील. ती सगळी आपल्याला एकदमच मिळाली तर....

©KTBS NOT TO BE REPUBLISHED





हा विचार येताच, त्याने घरातून कोयता आणला. त्या कोंबडीला जवळ घेतले आणि कोयत्याने खस्सकन तिचे पोट कापले. पण हाय! आत एकही अंडे नव्हते. कोंबडी तर मरून गेली. कोंबडी मेल्यामुळे, त्या दिवसापासून अंडे मिळणंही बंद झालं. तो हताश आणि दुःखी झाला. पण आता काय करणार? अति लोभामुळे त्याला सर्वच गमवावे लागले.

# अतिलोभ

✻ **पाठ मोठ्याने वाचा.**

✻ **पाठाच्या आधारे वाच आणि लिही.**

(अ) शेतकऱ्यांने पाळल्या होत्या ......................

(आ) कोंबडी दररोज देत होती........................

(इ) शेतकऱ्यांने हा विचार केला......................

(ई) शेतकऱ्यांने निर्णय घेतला........................

(उ) शेतकरी यामुळे दुःखी झाला.....................

✻ वाचा शिक्षकांकडून समजून घ्या.

विनाशकाले विपरीत बुध्दी.

✻ यांना समजून घेऊया.

थोडा विचार करुया आणि लिहूया.

| अवयवाचे चित्र | अवयवाचे नाव | हा अवयव कोणाचा ? | रहाण्याचे ठिकाण | यांचे अन्न |
|---|---|---|---|---|
|  | | | | |
|  | | | | |
|  | | | | |
|  | | | | |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## ऐका. म्हणा. वाचा.

जेथे वनराई
तेथे पशूपक्षी भारी
जेथे पशूपक्षी भारी
तेथे वनराई





पाठ
15

# भाज्यांची सभा

एका हिरवळीतील शेतीवाडीत भाज्यांची सभा भरली होती. मेथी, शेपू, कोथिंबीरीची सगळीकडे वर्दळ होती. पडवळ, दूधी, शेवगा आणि दोडकं सारेजण दिसत होते खूप खूप आनंदी! कांदा-मुळा दोघेही ऐटीत दिसत होते. हे सारे कारल्याच्या डोळ्यात खूपत होते. डौलदार भेंडी मध्येच फिरत होती. येता जाता साऱ्यांचे स्वागत करत होती. पुदिन्याच्या वासाने वातावरण प्रफुल्लित झाले होते.



कडिपत्त्याने तर साऱ्यांना आनंदित केले होते.

इतक्यात ढेर-पोट्या भोपळ्याचे आगमन झाले. ते पाहून सारे म्हणाले, ''चला, चला भाज्यांचा राजा आला. लगबगीने सारेजण कामाला लागा.'' फुलांचा गुच्छ धरुन फ्लॉवर उभे होते. राजांची भेट घेण्यास भलतेच आतुर होते. शेताच्या उंच बांधावर भोपळा राजे बसले. सगळीकडे शांतता पसरली. लुसलुसीत मिरचीने छान

© NOT TO BE REPUBLISHED



गाणे गायिले. लाल-लाल गाजरांनी सुंदर नाच केला. कोवळ्या काकडीने काव्य वाचन केले. वांगी व बीट यांनी कथा-कथन केले.

बटाटेबुवानी भोपळेरावांचे स्वागत केले. तोंडली, कोबी व ढोबळी मिरची बाजूलाच उभ्या होत्या. टोमॅटोरावांची लुडबूड मध्येच चालली होती. माझे ऐका, माझे ऐका असे ओरडून सांगत होते. दिमाखदार राजांचे भाषण सुरु झाले. ''माझ्या चवदार मित्रांनो आणि मैत्रिणींनो; या सभेसाठी निमंत्रण देवून माझे स्वागत ही केले माझे-मला भान हरपून गेले. मी आज खूप आनंदी आहे. या सभेमुळे आपली ओळख साऱ्यांना होत आहे; यामुळे माझे मन प्रसन्न झाले आहे. मित्रांनो, आपली चव सर्वांना आवडत राहो, सर्वांना भरभरून जीवनसत्व मिळत राहो असे मला मनापासून वाटते. धन्यवाद!

सर्वच भाज्यांनी माना डोलावल्या आणि शेवटी सभेची सांगता झाली.

रितिशाला अचानक झोपेतून जाग आली. सर्व भाज्यांनी स्वप्नात धम्माल

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# अभ्यास

**⁕ नवीन शब्दांचे अर्थ**

वर्दळ–फेऱ्या मारणे,  डौलदार – रेखीव,   प्रफुल्लित – आनंदित,  प्रसन्न.
धम्माल – गम्मत.

**⁕ अ. पाठ मोठ्याने वाचा.**

**⁕ आ. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) शेतीवाडीत कोणाची सभा भरली होती?
2) कांदा मुळा कसे दिसत होते?
3) साऱ्यांचे स्वागत कोणी केले?
4) या सभेचा राजा कोण होता?
5) सारे कशासाठी आतूर झाले होते?

**⁕ इ. खालील शब्दांचे अनेकवचन करा.**

1)  

2)  

3)  

4)  

5)  

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## ई. चव ओळखून पदार्थांची नावे लिहा.

1) गोड ........................ ........................ ........................ ........................

2) कडू ........................ ........................ ........................ ........................

3) आंबट ........................ ........................ ........................ ........................

4) तिखट ........................ ........................ ........................ ........................

## ई. जोड्या जुळवा

1) भोपळा 

2) कोबी 

3) गाजर 

4) फ्लॉवर 

5) टोमॅटो 

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 16

# मंगळावरची शाळा

मंगळावरची मुले
पृथ्वीवर आली,
शाळेतल्या गंमती
सांगू लागली.



मंगळावरच्या शाळेत
पाटी-पेन्सिल नसते,
पुस्तकाचेही ओझे
खांद्यावर नसते.



संगणक पेटीच
वर्गात असते,
शिक्षकांच्या हातात
पुस्तक नसते.

मुलांपाशी असते
संगणक डबी,
तिच्यात असते
सगळी खुबी.

इतक्यात तबकडी
चमकू लागली,
मुलांना घेऊन
भुर्रकन गेली!



– फादर फिलीप कार्व्हालो

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# अभ्यास

## नवीन शब्द

मंगळ – सूर्यमालेतील एक ग्रह
पृथ्वी – धरती
खुबी – युक्ती
मुलांपाशी – मुलांजवळ
तबकडी – गोलाकार पत्रा

## अ. उत्तरे लिहा

१) पृथ्वीवर कोण आले ?
२) मंगळावरच्या शाळेत काय काय नसते ?
३) वर्गात कोणती पेटी असते ?
४) मुलांना घेऊन कोण गेली ?

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## आ. खालील शब्द बघून लिहा

१) पृथ्वी ........................ ........................ ........................ ........................
२) पेन्सिल ........................ ........................ ........................ ........................
३) पुस्तक ........................ ........................ ........................ ........................
४) भुर्कन ........................ ........................ ........................ ........................

## इ. खालील चित्रे ओळखून नावे लिहा.

   

पाठ 17

# एकीचे बळ

एकदा एका जंगलामध्ये एक पारधी शिरला. पक्ष्यांनां पकडण्यासाठी त्याने जाळे पसरले.





पक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी जाळ्यावर धान्य टाकले. पक्ष्यांनी धान्य पाहिले व धान्य खाण्याच्या आशेने त्यांचे जाळ्याकडे दुर्लक्ष झाले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

पक्षी धान्य खाण्यासाठी जाळ्यावर बसले व जाळ्यात अडकले. पक्ष्यांनी जाळ्यात अडकल्यावर किलकिलाट केला. तो ऐकून लपलेला पारधी पक्ष्यांना धरण्यास येऊ लागला.





पारध्याला पाहून सर्वच पक्षी घाबरले, पण त्यातलाच
एक हुशार पक्षी होता. त्याने एक उपाय शोधला.
सर्वांना त्याने शांत केले व सांगितले की,
सर्व पक्ष्यांनी मिळून जाळ्यासह एकदम उडून जावे.
त्या प्रमाणे सर्व पक्षी पूर्ण शक्तीनिशी जाळ्यासह
आकाशात उडाले. पक्ष्यांची सुटका झाली. सर्व पक्षी आनंदले.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

## अभ्यास

* **नवीन शब्द :** – पारधी–पक्षी पकडणारा, थवा – पक्षांचा समूह

* खालील प्रश्नांची उत्तरे सांगा.

1) पक्ष्यांसाठी जाळे कुणी घातले होते ?
2) जाळ्यात कोण अडकले ?
3) पारध्याला दूरवरून येताना कोण पाहिले ?
4) पक्ष्यांनी कोणता निर्धार केला ?

* पक्षी व त्यांच्या आवाजांच्या जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| 1) चिमणी | मिठू मिठू |
| 2) कावळा | कुहूकुहू |
| 3) पोपट | चिवचिव |
| 4) कोकिळा | कावकाव |

* अक्षरावरून शब्द तयार करा आणि लिहा.




NOT TO BE REPUBLISHED @KTBS

पाठ 18

# प्रामाणिक बालक

X3W8E4



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

काही वर्षापूर्वीची गोष्ट आहे. एकदा एक मुलगा व त्याचा मामा गंगा नदीच्या काठी फिरायला गेले. जाता जाता तिथे त्यांना एक म्हातारा माणूस टोपलीतून आंबे विकत असतांना दिसला. त्याने ''घ्या घ्या, खूप गोड आंबे आहेत'' असे म्हणून त्या मुलाला व त्याच्या मामाला एक-एक आंबा खाण्यास दिला. दिवस मावळू लागल्याने आणि घरी जाण्याची घाई असल्याने ''एक आणा द्या आणि हे शंभर आंबे घरी न्या'' असे तो म्हणाला.

आंबे खरेच खूप गोड होते. मुलाने व मामाने एक आणा देऊन आंबे खरेदी केले. म्हातारा आंबे मोजू लागला. पन्नास आंबे मोजून होताच मुलगा म्हणाला, ''आजोबा, पूरे झाले पन्नास, यापेक्षा आम्हाला अधिक आंब्याची गरज नाही''.

म्हातारा म्हणाला. ''अरे, मी एक आण्याला शंभर आंबे द्यायचे कबूल केले आहे तुम्ही मला एक आणाही दिलात म्हणून मला तुम्हाला शंभर आंबे द्यायलाच हवेत.''

''आजोबा, एक आणा तुम्ही ठेवून घ्या. आम्हाला एवढे पन्नास आंबे पुरे झाले.'' म्हाताऱ्याला या छोटया मुलाचे फार कौतुक वाटले. तो आनंदाने निघून गेला.

मामा तोपर्यंत गप्प होता. म्हातारा जाताच तो मुलाला म्हणाला, ''अती शहाणा आहेस. ते आजोबा शंभर आंबे एक आण्यात देत होते तरी तू पन्नासच का घेतलेस?''

त्यावर मुलगा म्हणाला, ''अरे मामा, संध्याकाळ झाली म्हणून तो शंभर आंबे देत होता. आपण त्याच्या अडचणीचा असा गैरफायदा कशाला घ्यायचा? गरजेपुरते पुरे झाले.''

सहा वर्षांच्या त्या मुलाची केवढी ही न्यायबुध्दी. चांगल्या संस्कारांमुळेच तो असा वागला.

या मुलाचे नाव लालबहादूर शास्त्री. जे पुढे भारताचे दुसरे पंतप्रधान झाले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## अभ्यास

### नवीन शब्दांचे अर्थ :-

मावळणे – अस्तास जाणे

एक आणा – पूर्वीचे सहा पैसे

अडचण – कठीण प्रसंग

अधिक – खूप

### अ. खालील शब्द मोठ्याने वाचा

मुलगा, गंगा, म्हातारा, गैरफायदा, पन्नास, संध्याकाळ, न्यायबुध्दी, संस्कार, पंतप्रधान.

### आ. खालील वाक्ये घटना घडलेल्या क्रमाने लिहा.

१. म्हातारा आनंदाने निघून गेला.
२. म्हातारा आंबे विकत होता.
३. म्हाताऱ्याला मुलाचे कौतुक वाटले.
४. मुलाने पन्नास आंबे विकत घेतले.

५. मामा व मुलगा गंगा नदीच्या काठी फिरावयास गेले.

## इ. बरोबर की चूक सांगा.

१. मामा व मुलगा बागेत फिरावयास गेले.

२. मुलाने फक्त पन्नासच आंबे घेतले.

३. आजोबा चिक्कू विकत होते.

४. मुलगा प्रामाणिक होता.

## ई. अक्षरांची योग्य जुळणी करून शब्द तयार करा आणि लिहा.

१. मा स णू ......................... ४. व दि स ....................

२. ता म्हा रा .......................... ५. गा मु ल ...................

३. अ ण ड च ..................... ६. ध्या का सं ळ .................

## उ. मुलगा ऐवजी मुलगी हा शब्द वापरुन वाक्ये पुन्हा लिहा.

१. मुलगा फिरायला गेला. ........................................

२. मुलाने आंबा घेतला. ........................................

३. मुलगा प्रामाणिक होता. ........................................

४. मुलाला आजोबांची दया आली. ........................................

## ऊ. खालील वाक्ये कोणी कोणाला म्हटली आहेत ते लिहा.

| | ......... | ......... |
|---|---|---|
| १. ''घ्या घ्या खूप गोड आंबे आहेत''. | कोणी | कोणाला |
| २. ''आजोबा, पुरे झाले पन्नास''. | ........ | ........ |
| ३. ''अती शहाणा आहेस''. | ........ | ........ |
| ४. ''मी एक आण्याला शंभर द्यायचे कबूल केले आहे''. | ........ | ........ |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ए. जवळच्या बागेस भेट द्या. त्याचे वर्णन तुमच्या शब्दात सांगा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

पाठ 19

# ऋतुगीत

आला आला हो पावसाळा आला
पेरणीला जाऊ सारे चला ।
पीक जोमानं आलं शेतात
रुप देवाचं दिसे पिकात ।।





आला आला हो हिवाळा आला
पानझडीला बहर आला ।
लेणं लेवून शुभ्र धुक्यांच
नटून बसलं शेत ज्वारीचं ।।

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

आला आला हो उन्हाळा आला
शीत पेयांना आवर घाला ।
वर उन्हाचा भलताच ताप
मोहून टाकी आंब्याचा काप ।।



तिन्ही ऋतुंची किमयाच न्यारी
त्या त्या वेळी रुबाब यांचा भारी ।
देवा अजब तुझी चित्रकारी
म्हणून येती सारे तुझ्या दारी ।।

# अभ्यास

**✻ शब्द वाचा.**

ऋतू, पेरणी, जोमानं, शुभ्र, धुक्याचं, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा, किमया, रुबाब, ज्वारीचं, चित्रकारी.

**✻ खाली दिलेल्या शब्दांना लयबध्द शब्द लिहा.**

नमुना – आला – चला

१. शेतात – ....................

२. धुक्याचं – ....................

३. ताप – ....................

४. न्यारी – ....................

५. चित्रकारी – ....................

**✻ जोडया जुळवा.**

१. उन्हाळा



२. पावसाळा




३. हिवाळा



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

* खालील अक्षरांच्या मदतीने शब्द तयार करा.

उ वा ळा

पा न्हा सा

हि व

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

पाठ 20

# कोरोनाचे थैमान

नमस्कार, बालमित्रांनो

विद्यार्थी : नमस्कार, गुरूजी.

गुरूजी : मुलांनो, आज तुम्हाला वाऱ्यापेक्षा वेगाने जगभर फैलावलेल्या कोरोना विषाणूबद्दल माहिती सांगणार आहे.

अथर्व : बापरे! वाऱ्यापेक्षा वेगाने? किती भयंकर असेल हा विषाणू! समजून घ्यायलाच हवे.

रितु : खरंच, असं असेल का ग वेदिका?

गुरूजी : रितू, काय ग, काय बरे चालले आहे इथे?

वेदिका : गुरूजी, आम्हाला वाटते हे काही खरं नसेलंच.

गुरूजी : खरे आहे! या विषाणूबद्दल अधिक माहिती समजून घेऊया.

अन्वित : गुरूजी हा विषाणू इतका कसा वाईट आहे? ज्यामुळे आम्हा मुलांच्या शाळा सुध्दा बंद केलेल्या आहेत.

गुरूजी : बाळांनो हा विषाणू इतका भयंकर आहे की तो हवेतून, वस्तू व व्यक्तींच्या स्पर्शातून माणसांच्या शरीरात प्रवेश करतो.

आराध्या : ते कसं काय गुरूजी?

गुरूजी : हे बघ आराध्या. ज्या माणसात हा विषाणू दिसून येतो, ती व्यक्ती जर शिंकली तर तिच्या नाकावाटे असंख्य विषाणू बाहेर पडतात. त्या बाहेर पडलेल्या विषाणूवर आपला हात लागला किंवा आपल्या नाकातोंडात त्या विषाणूनी प्रवेश केला तर आपल्यालाही संसर्ग होऊ शकतो.

निशांत : होय गुरूजी, मी टी.व्ही.(TV) वर मास्क व सॅनिटायझरची जाहिरात दररोज बघतो. त्यामध्ये हे सारे दाखवतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

गुरूजी : अगदी बरोबर निशांत जगभर थैमान माजविलेल्या या विषाणू कोरोनाचा प्रतिबंध करण्यासाठी मास्क, सॅनिटायझर बरोबरच सामाजिक अंतर सुध्दा पाळायला हवे. तसेच उघड्यावरील पदार्थ खाणे, थंड पेये पिण्याचे टाळायला हवे.

अौंव : होय गुरूजी, माझी आई बाजारात जाताना मास्क व सॅनिटायझर लावल्याशिवाय बाहेरच जात नाही.

गुरूजी : होय बाळांनो, आता आपली सुरक्षा आपणच करुन घेतली पाहिजे. म्हणूनच आम्ही सांगतो की मास्क घाला, सॅनिटायझर लावा, सामाजिक अंतर पाळा व कोरोना-19 ला पळवून लावा.

कृष्णा : हो गुरूजी, आम्ही रोज ठराविक कालावधी नंतर हात स्वच्छ धुवून घेऊ.

रितू : वेळोवेळी सॅनिटायझरचा वापर करु.

अथर्व : आम्ही गर्दीत सामाजिक अंतर पाळू.

आराध्या : या भयानक विषाणूबद्दल आम्ही जागृती करु व याला रोखण्यासाठी प्रयत्न करु.

गुरूजी : शाब्बास विद्यार्थ्यांनो!

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## वर्गकार्य

### ✻ योग्य जोड्या जुळवा.

(अ) मास्क



(आ) सॅनिटायझर



(इ) हँडवॉश



(ई) सामाजिक अंतर



(उ) कोरोना विषाणू



@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

✻ कोरोनापासून दूर राहाण्यासाठी तू काय करशील? याबद्दल तुझ्या मित्रांशी चर्चा कर.

✻ उपक्रम.

कोरोनासाठी प्रसार माध्यमातून दिल्या जाणाऱ्या विविध जाहिरातीबाबत अधिक माहिती मिळव.

पाठ 21

# शब्द डोंगर

**वाचा आणि लिहा.**



आंबा

हा आंबा.

हा आंबा आहे.

हा आंबा मोठा आहे.

हा आंबा मोठा, पिवळसर आहे.

हा आंबा मोठा, पिवळसर, व रसाळ आहे.

हा आंबा मोठा, पिवळसर, रसाळ व गोड आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

खालील शब्द घेऊन 'शब्द डोंगर' तयार करा.

1) झाड 2) फूल 3) फळ

वाचा. समजून घ्या.

1) गोड : साखर, गूळ, खडीसाखर

2) तिखट : मिरची, लवंग, मिरी

3) आंबट : ताक, चिंच, कैरी, लिंबू

4) खारट : मीठ, समुद्राचे पाणी

5) तुरट : आवळा, सुपारी

पाठ 22

# माझा भारत



हा भारताचा राष्ट्रध्वज.
राष्ट्रध्वज तिरंगी आहे.

मोर हा भारताचा.
राष्ट्रीय पक्षी आहे.





कमख हे भारताचे.
राष्ट्रीय फूल आहे.

हा भारताचा राष्ट्रीय प्राणी वाघ.
वाघ ऐटदार आहे.





दिल्ली भारताची राजधानी.
दिल्ली मोठे शहर आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 23

# अंक
## (२१ ते ५०)

C3B5Y3

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 21 | २१ | एकवीस | 36 | ३६ | छत्तीस |
| 22 | २२ | बावीस | 37 | ३७ | सदतीस |
| 23 | २३ | तेवीस | 38 | ३८ | अडतीस |
| 24 | २४ | चोवीस | 39 | ३९ | एकोणचाळीस |
| 25 | २५ | पंचवीस | 40 | ४० | चाळीस |
| 26 | २६ | सव्वीस | 41 | ४१ | एक्केचाळीस |
| 27 | २७ | सत्तावीस | 42 | ४२ | बेचाळीस |
| 28 | २८ | अठ्ठावीस | 43 | ४३ | त्रेचाळीस |
| 29 | २९ | एकोणतीस | 44 | ४४ | चव्वेचाळीस |
| 30 | ३० | तीस | 45 | ४५ | पंचेचाळीस |
| 31 | ३१ | एकतीस | 46 | ४६ | शेहेचाळीस |
| 32 | ३२ | बत्तीस | 47 | ४७ | सत्तेचाळीस |
| 33 | ३३ | तेहतीस | 48 | ४८ | अठ्ठेचाळीस |
| 34 | ३४ | चौतीस | 49 | ४९ | एकोणपन्नास |
| 35 | ३५ | पस्तीस | 50 | ५० | पन्नास |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## अभ्यास

### 1. अंकात लिहा.

| | | |
|---|---|---|
| पंचवीस | 25 | २५ |
| सदतीस | ---------- | ---------- |
| एकोणपन्नास | ---------- | ---------- |
| बेचाळीस | ---------- | ---------- |

### 2. शब्दात लिहा

| | | |
|---|---|---|
| 21 | २१ | एकवीस |
| 36 | ३६ | ---------- |
| 47 | ४७ | ---------- |
| 32 | ३२ | ---------- |

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

### 2. शब्दात लिहा

| | | |
|---|---|---|
| 25 | २५ | पंचवीस |
| 28 | २८ | ---------- |
| 33 | ३३ | ---------- |
| 43 | ४३ | ---------- |
| 45 | ४५ | ---------- |

## 4. अंक व शब्द भरा

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 21 | | | | | चाळीस |
| 33 | | | 30 | | |
| | | चव्वेचाळीस | | | अडतीस |
| 27 | | | | ४६ | |
| | | सत्तेचाळीस | | ३४ | |
| | ४९ | | 24 | | |
| | | एकोणतीस | | ४३ | |
| 39 | | | | ३७ | |
| | | पस्तीस | | | बत्तीस |
| | | तेहतीस | 45 | | |
| 22 | | | | | पन्नास |
| | ३९ | | | २८ | |
| | ४० | | | | एक्केचाळीस |
| 36 | | | 48 | | |
| 42 | | | | २३ | |
| | ३५ | | | | पस्तीस |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# शब्द संग्रह

| अ | उ | ओ | क |
|---|---|---|---|
| अबब | उभा | ओढा | कैरी |
| अकबर | उठा | ओझेवाला | क्रम |
| अक्षर | उखळ | ओणवा | कैलास |
| अंध | उखाणा | ओम | कौलारु |
| अथर्व | उगवणे | ओलांडणे | कंगाल |
| अर्भक | उदबत्ती | **औ** | कॅच |
| **आ** | **ऊ** | औत | **ख** |
| आपण | ऊस | औषध | खिळा |
| आवार | ऊन | औदुंबर | खर्च |
| आली | ऊनवारा | औटकी | खर्चिक |
| आवड | ऊसनवार | **अं** | खातेदार |
| आश्रम | **ए** | अंक | खांब |
| आक्रमण | एकी | अंगठी | खुळखुळा |
| ऑफिस | एकटा | अंबारी | ख्रिस्त |
| **इ** | एखादा | अंबर | ख्रिसमस |
| इतर | एकर | अंदाज | **ग** |
| इसम | एकवटून | अंध | गीता |
| इडलिंबू | **ऐ** | **क** | गाडी |
| इमारत | ऐरण | कडक | गोडधोड |
| **ई** | ऐरावत | कमान | गच्च |
| ईश | ऐतखाऊ | कर्ण | गब्बर |
| ईश्वर | ऐपत | कर्म | गर्क |
| | | केसरी | गौतम |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

| | | | |
|---|---|---|---|
| गिऱ्हाईक | **ड** | **द** | |
| गहिवरणे | डावा | दरवाजा | प्रतिबिंब |
| गृहस्थ | डमरु | दिनकर | प्राजक्त |
| **घ** | डरॉंव | दुःख | प्रवेशद्वार |
| घराणे | डौलदार | द्रव | **फ** |
| घट्ट | ड्रम | द्रावण | फुले |
| घड्याळ | **ढ** | दौलत | फुलझाडे |
| घंटा | ढग | **ध** | फुगे |
| घनदाट | ढगूबाई | धरण | फुगला |
| **च** | ढसाढसा | धाक | फ्रेम |
| चमक | **त** | सुधीर | **ब** |
| चाहूल | तलवार | धामधुम | बचाव |
| चाकू | तळे | धक्धक् | बसली |
| चिक्कार | तर्र | **न** | बिछाना |
| चमत्कार | त्रास | नयन | ब्रश |
| चार्ट | तिखट | नक्षीदार | बेशुद्ध |
| | तुषार | नायनाट | बहादुर |
| **छ** | तिरंगी | नम्रता | **भ** |
| छगन | **थ** | नरक | भडक |
| छत्री | थडगे | **प** | भाषा |
| छत्रपती | थवा | पदर | भारतमाता |
| छडी | थोडक्यात | पुरणपोळी | भ्रम |
| छबी | थांबणे | पर्स | भुर्र |
| | थुईथुई | प्रताप | भेळवाला |
| | | प्रगत | |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

| | | | |
|---|---|---|---|
| **म** | लोकमान्य | **स** | **ज्ञ** |
| मलम | लोणी | सदन | ज्ञानेश्वर |
| मज्जा | **व** | सनई | ज्ञानमंदीर |
| मदन | विज्ञान | सर्प | ज्ञानदिप |
| मर्द | विजया | सर्कस | ज्ञान |
| मांजा | वज्र | सायांनी | **ऋ** |
| मौज | वर्ण | सुज्ञ | ऋषी |
| मावशी | वर्ख | सुप्रिया | ऋण |
| मार्च | वैशाली | | ऋतू |
| मानतो | व्याघ्र | **ह** | ऋतूजा |
| **य** | **श** | हरपणे | **श्री** |
| यज्ञ | शशी | हरवणे | श्रीखंड |
| यश | शरयु | हरताळ | श्रीयुत |
| यथोचित | शुक्रवार | हिंमत | श्रीमती |
| यशवंत | शैला | हेमंत | **त्र** |
| **र** | शहाणा | हॅट | त्रिकुट |
| रवींद्र | शहामृग | **क्ष** | त्रयोदशी |
| रत्न | **ष** | क्षत्रिय | त्रिमिती |
| रात्रंदिवस | षटक | क्षमा | त्रिलोक |
| राक्षस | षट्कार | क्षण | त्रास |
| रस्ता | षट्कोन | क्षणभर | चित्रकुट |
| **ल** | पुष्कळ | | |
| लाल | | | |
| लक्ष | | | |

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED